संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
12 AUG 2026
प्राप्त झाले सही.........................

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक संवर्गातील श्री. अतुलकुमार रामराव गायकवाड यांच्या बदलीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन आदेश :-संलेको-२०२६/प्र.क्र.१५०/(E-१७७२७७५)/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १२ ऑगस्ट, २०२६

**शासन आदेश**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) व ४ (५) मधील तरतूदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाराच्या मान्यतेने प्रशासकीय कारणास्तव महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक संवर्गातील खाली नमूद अधिकाऱ्याची स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या रिक्त पदावर बदली करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याचे पदनाम व कार्यालय | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | श्री. अतुलकुमार रामराव गायकवाड | मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परिषद, चंद्रपूर | उपसंचालक, पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई शहर |

२. श्री. गायकवाड यांनी बदलीच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच, संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

४. श्री. गायकवाड यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्वीकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशील HRMS मधील नमून्यात भरून नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच, संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता. र. पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. सहसचिव, मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,

२. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर. *
३. पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई शहर. *
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर. *
५. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
६. श्री. अतुलकुमार रामराव गायकवाड, उप संचालक, *
७. निवडनस्ती कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(*संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)